आता दै. लातूर प्रभात इंटरनेटवर वाचा एका क्लिकवर www.dainiklaturprabhat.in

# दैनिक लातूर प्रभात

E-mail :- laturprabhat@gmail.com

मुख्य संपादक : रघुनाथ बनसोडे मो.नं.८८३०२ ५०६४५,

RNI No.: - MAHMAR/2017/72894 ● वर्ष ८ वे ● अंक १६४ वा ● गुरुवार दि. २८ नोव्हेंबर २०२४ ● किंमत २ रूपया ● पाने ४ ●










## झरोका

एक – ठाकरे, ठाकरे सेना, मनसे हे काय चाले आहे हे कांही कळतच नाही, ही धुळफेक पवारांची की फडणवीसाची हे कांही कळत नाही, डोक बधीर झालेलं आहे.

दुसरा – अरे, राजकारणा मध्ये असे तसे कांहीच नसते, मोसमानुसार जशी हवा बदलते, रोगराई पसरते, त्यानुसार राजकीय नेते ही, बरगळत जातात, त्यामूळे जेष्ठ गायक, प्रल्हाद शिंदे यांच्या शब्दात सांगायचे झाल्यास, कल युगाची झाली भेळ, लावली रताळं, आली केळं, अशीच अवस्था राजकारणाची झाल्यामूळे कोण पवार, कोण फडणवीस, कोण मोदी, कोण चव्हाण, अशीच कुजबूज सर्वत्र कुजग्या अवस्–थेत होत असताना तू ठाकरे–पवार काय म्हण–तोसं, गप्प बसं ना.

एक – अहो, सरकटल्या सारखे काय बोल–ता, भारतीय राजकारणात लोकशाही जिवंत असताना खेकडी प्रवृत्ती बळावते आहे, यामुळे एकमेकाचे पाय ओढून लोकशाहीला कमजोर केले जाते आहे, आजघडीला तर लोकशाही आहे की नाही, हेच चित्र दिसते आहे, त्यामूळे माझ्यासारख्यानी जाब कोणाला विचारावा म्हणून बोलतो आहे, पंरतू तूम्ही तमाम भारतीय राजकारणातील नेत्यांची गोधडीचं माझ्या अंगावर कशाला टाकता.

दुसरा – अरे, तुझ्यावर गोधडी मी कशाला टाकू, कारण राष्ट्रीय पातळीवरुनच गोधडी नांवाची वाकळ सर्वसामान्य जनतेच्या डोक्यावर पसरवीली जाते आहे, एक है तो सेफ है, अशा नाऱ्यातून जनतेला फसविले जाते आहे, त्यावर मी तूझी दिशाभूल करणारा मी कोण, हे तू विचार कर.

एक – अहो, असे मला शालीत घेवून बोलू नका, मला ही राजकारण, सत्ताकारण कळते, पंरतू मी लोकप्रतिनिधी नसल्यामूळे लंगडा आहे म्हणून मला कमी समजू नका, खेकड्या चालीला एका शब्दात सरळ करणारा मी माणूस आहे, याची जाण ठेवा, म्हणजे तूम्हाला मी कोण ते कळेल.

दुसरा – अरे, अशी धमकी तू मला देवू नकोस, हिम्मत असेल तर भारत विकायला निघालेल्या प्रधान मंत्री नरेंद्र मोदी आणि गृहमंत्री अमित शहा यांच्या बरोबर महाराष्ट्राती देवेंद्र फडणवीस आणि छत्रपतीची औवलाद एकनाथ शिंदे यांना समजावून सांगावे एवढेच वाटते.

## काय बोलता राव ?

लोकसभा निवडणूका झाल्या, महाराष्ट्र विधानसभा निवडणूक पार पडली, भाजपा महायुती सोबत असलेले सहयोगी रिपाइं नेते केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांनी, महाराष्ट्र शासनाच्या फडणवीस मंत्री मंडळात रिपाइं पक्षाचा एक मंत्री असावा त्यात पिपल्स पक्षाचे कवाडे गटांचे जयदीप कवाडे यांनी ही, कवाडे गटाला एक मंत्री पद मिळावे आणि त्याच बरोबर आंबेडकरी चळवळीतील कार्यकर्त्यांना माहित नसलेल्या तानसेन ननावरे यांनी ही आम्हाला ही कांही तरी मिळालेच पाहिजे अशी रोखठोक भुमिका घेतल्यामूळे महाराष्ट्र विधानसभा सभागृहच काय, संसद भवन ही थरथरल्यासारखे होते आहे.

**काय बोलता राव !**

अरे, मागच्या काळात आठवले–कवाडे यांच्या नावावर आंबेडकरी जनता जिव द्यायला तयार होती, पंरतू तेच स्वार्थी आणि मतलबी झाल्यामूळे त्यांच्या घरातीलच सदस्य त्यांच्या सोबत नाहीत, पंरतू मागच्या इतिहासावर ते राजकारणात पाय रोवून बसले असले तरी सत्ताधारी पक्ष नेत्याना आठवले–कवाडे यांची काय अवकात आहे, याची माहिती असताना ही, आंबेडकरी जनतेच्या भिती पोटी त्यांना होयबा म्हणत असतात, आणि त्यांना थोपटून गप्प बसवीतात, यामुळे आंबेडकरी जन–तेला भूलवून, झूलवून कसे ठेवावे यासाठी आठवले कवाडे, सत्ताधाऱ्यांशी गोरख धंदा करुन आपापले पोळी भाजून घेताना दिसतात, त्यात जनतेचे काय, मग बोला दाजीबा !




## महाराष्ट्रातील काँग्रेस पक्षाच्या नवनिर्वाचित आमदार व जिल्हाध्यक्षांच्या बैठकीस माजी मंत्री आमदार अमित देशमुख राहीले उपस्थित

लातूर (प्रतिनीधी) :काँग्रेस पक्षाच्या महाराष्ट्रातील ज्येष्ठ नेत्यांच्या उपस्थितीत टिळकभवन मुंबई येथे झालेल्या नवनिर्वाचित आमदार व जिल्हाध्यक्षांच्या बैठकीस राज्याचे माजी वैद्यकीय शिक्षण सांस्कृतीक कार्यमंत्री व लातूर जिल्ह्याचे माजी पालकमंत्री आमदार अमित विलासराव देशमुख उपस्थित राहीले.



विधानसभा निवडणूक निकाला नंतर पक्षाची पुढील रणनीती ठरवण्यासाठीच्या चर्चेत सहभाग घेतला. यावेळी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीच प्रदेशाध्यक्ष आमदार नानाभाऊ पटोले यांनी त्यांचे स्वागत केले. महाराष्ट्र प्रांताध्यक्ष आमदार नानाभाऊ पटोले यांच्या अध्यक्षतेखाली

राज्यातील काँग्रेस पक्षाचे नवनिर्वाचित विधानसभा सदस्य व नांदेड लोकसभेचे नवनिर्वाचित सदस्य तसेच नवनिर्वाचित सदस्यांचे संबंधित जिल्हाध्यक्ष यांची बैठक बुधवार, दि. २७ नोव्हेंबर, २०२४ रोजी दुपारी १.०० वा. टिळक भवन, दादर, मुंबई येथे आयोजित करण्यात आली. या बैठकीस राज्याचे माजी वैद्यकीय शिक्षण सांस्कृतीक कार्यमंत्री व लातूर जिल्ह्याचे माजी पालकमंत्री आमदार अमित विलासराव देशमुख उपस्थिती राहीले, काँग्रेस पक्षाची विधानसभा निवडणूक निकालानंतरची पुढील रणनीती ठरवण्यासाठीच्या चर्चेत सहभाग घेतला. विधानसभा निवडणूकीत काँग्रेस महाविकास आघाडीला झालेले मतदान, या अनुषंगाने पूढील काळातील नियोजन बाबत चर्चा झाली.

या बैठकीत महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे प्रदेशाध्यक्ष आमदार नानाभाऊ पटोले यांनी राज्याचे माजी वैद्यकीय शिक्षण सांस्कृतीक कार्यमंत्री व लातूर जिल्ह्याचे माजी पालकमंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांचे स्वागत केले.

## 'विकासाचा विचार करताना पर्यावरण रक्षणाबद्दल दुराग्रही भूमिका नको'– राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन

मुंबइ : देशाच्या प्रगतीसाठी तसेच सर्वसामान्यांच्या हितासाठी विकासासोबतच पर्यावरण रक्षणही महत्त्वाचे आहे. मात्र पर्यावरण रक्षणाबाबत अनेकदा दुराग्रही भूमिका घेतली जाते. पर्यावरण आणि विकास यामध्ये समन्वय असला पाहिजे, पर्यावरणाबाबत दुराग्रही भूमिका नसावी, असे प्रतिपादन राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांनी केले.



'पर्यावरणासाठी जीवनशैली : शाश्र्वत विकासासाठी भारतीय दृष्टिकोन' या विषयावरील चर्चासत्राचे उद्घाटन राज्यपाल राधाकृष्णन यांच्या प्रमुख उपस्थितीत नॅशनल स्टॉक एक्स्चेंज, मुंबई येथील सभागृहात झाले, त्यावेळी ते बोलत होते.

चर्चासत्राचे आयोजन गोवर्धन इको व्हिलेज संस्थेने 'कोटक स्कूल ऑफ सस्टेनेबिलिटी', नॅशनल स्टॉक एक्स्चेंज, एनआयटी वारंगल आदी संस्थेच्या सहकार्याने केले.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी पर्यावरण रक्षणाला प्राधान्य दिले आहे. स्वच्छ ऊर्जा निर्मिती वाढविण्यासाठी तसेच कार्बन उत्सर्जन कमी करण्याच्या दृष्टीने राष्ट्रीय पातळीवर प्रयत्न केले जात आहेत. मात्र कधी–कधी पर्यावरण विषयांवर ताठर भूमिका घेतली जाते. दक्षिण भारतातील एका मार्गावरील चार झाडांच्या रक्षणासाठी न्यायालयात याचिका दाखल केली गेली. या महामार्गावर पंधरा वर्षात जवळजवळ तीन हजार लोकांचे बळी गेले, असे सांगून चार झाडे कापणे आवश्यक असेल तर त्याऐवजी २५ नवी झाडे लावण्यासारखी सकारात्मक अट घातली गेली पाहिजे, असेही राज्यपालांनी यावेळी सांगितले.

देशात जलसंवर्धन व नदीजोड प्रकल्पांचे काम झाल्यास देशातील अन्नधान्याचे उत्पादन अनेक पटींनी वाढेल व भारत संपूर्ण जगासाठी अन्नधान्य उत्पादन करू शकेल, असे राज्यपालांनी यावेळी सांगितले.

भारतीय संस्कृतीमध्ये नदी, पर्वतराजी व वृक्षवल्लीची पूजा केली जाते. आपण निसर्गाचे व नैसर्गिक संपदेचे मालक नसून विश्र्वस्त आहोत ही भूमिका भारतीय विचारातून अधोरेखित केली जाते. वसुंधरा आपल्या विविधतेसह पुढील पिढ्यांपर्यंत पोहोचवणे ही सर्वांची जबाबदारी असल्याचे राज्यपालांनी सांगितले.

यावेळी गोवर्धन इको व्हिलेजचे संचालक गौरांग दास यांनी भारतीय विचारधारेतील पाण्याचा, अन्नधान्याचा व ऊर्जेचा जबाबदारीने विनियोग याबाबतचे चिंतन यावर भाष्य केले तसेच प्लास्टिक व इलेक्ट्रॉनिक कचऱ्याच्या आव्हानाबद्दल चिंता व्यक्त केली.

उद्घाटन सत्राला भारतीय नदी परिषदेचे सदस्य, 'रिव्हर मॅन ऑफ इंडिया' रमण कांत तसेच इतर मान्यवर उपस्थित होते.

## माझ्याशिवाय लातूरची काडी हालणार नाही, मंत्री कोणी असला तरी, गय नाही ?

लातूर (दैलाप्रप्र): महाराष्ट्राचे मंत्री मंडळ जाहिर झाले नाही, मुख्यमंत्री यांचा शपथ विधी झाला नाही, पंरतू पडझड झालेल्या कॉग्रेस पक्षात अशी तशी अस्तीत्वाची लढाई सुरु असतानाच पावसाळ्यातील टेकूळ्या प्रमाणे लातूर शहरा मध्ये अशा वावड्या उठल्या की, कॉग्रेसला नवजिवन मिळविण्यासाठी गडीवरचे युवराज आमदार अमित देशमूख हे प्रदेश कॉग्रेसचे अध्यक्ष होणार, अशा वावड्या उठविल्या गेल्या असून अमित देशमूख यांचे प्रभाग निहाय कार्यकर्ते हे लातूर शहर आणि जिल्ह्यातील सर्वांगीण विकासाच्या संदर्भात अमित भैय्या देशमूख यांच्याशिवाय काडी ही हालणार नाही, मग मंत्री म्हणून बनसोडे, निलंगेकर, किंवा पवार आले तरी ही, कांही चलणार नाही, अशीच दर्पोक्ती उठवीली जाते आहे.

त्यामूळे सर्वसामान्य जनते मध्ये असे काय बोलले जाते आहे, हे शंकात्मक वातावरण निर्माण झाल्याचे दिसते आहे. मुळात कॉग्रेस होत्याची नव्हती झाली, तरी ही नाक कापले तरी हवा यतेच आहे, अशी अवस्था असताना देशपातळीवर चिंताग्रस्त असलेल्या कॉग्रेस नेत्यामूळे राजकीय वर्तूळासह प्रसार माध्यमे चिंताग्रस्त झाले असताना ही, लातूरचा कॉग्रेसी युवराज अमित देशमूख मात्र आपापल्याच थाटात असल्यामूळे लातूर जिल्ह्यातील प्रसार यंत्रणेत हास्यकल्होळ होताना दिसतो आहे. शासन प्रशासन भाजपाचे असताना लातूरसह जिल्हाभरातील प्रशासन माझ्याशिवाय लातूरची काडी हालणार नाही, मंत्री कोणी असला तरी, त्याची गय नाही, अशी दर्पोक्ती आमदार अमित देशमूख करीत असतील तर त्यांच्यासारखा स्वपन्नातील सौदागर म्हणावे की, भविष्यकार म्हणावे अशीच उलटसूलट कुजबूज राजकीय वर्तूळात होताना दिसते आहे.

### जिल्हा सैंनिक कल्याण कार्यालययांच्याआस्थापनेवर अशासकीय माळी पदाची भरती

लातूर : जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय , लातूर यांचे आस्थापनेवरील माजी सैनिक विश्रामगृह, मल्टीपरपज हॉल येथे अशासकीय माळी पद तात्पुरत्या स्वरुपात एकत्रित मानधन प्रतिमाहा रक्कम रुपये १३ हजार ८९ प्रमाणे भरण्यात येणार आहे. ज्यांना माळी कामाचा अनुभव असेल, अशा महिला उमेदवारास प्राधान्य देण्यात येईल. तरी इच्छूक माजी सैनिक, विधवा व नागरी जीवनातील पुरुष, महिला उमेदवारांनी आपल्या अर्ज व सर्व मूळ कागदपत्रासह मुलाखतीसाठी ३ डिसेंबर, २०२४ रोजी सकाळी ११ वाजता लातूर जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय येथे स्वत: उपस्थित राहावे निवड करण्यात आलेल्या उमेदवारास तात्काळ कामावर घेण्यात येणार आहे, असे जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी ले. कर्नल शरद पांढरे (नि.) यांनी कळविले आहे.

## जिल्ह्यात शस्त्रबंदी व जमावबंदी आदेश जारी

लातूर (जिमाका) : कायदा व सुव्यवस्था, सार्वजनिक शांतता व सुरक्षितता अबाधित राखण्यासाठी अपर जिल्हादंडाधिकारी केशव नेटके यांनी महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ च्या कलम ३७ (१) व (३) नुसार संपूर्ण लातूर जिल्ह्याच्या हद्दीत शस्त्रबंदी व जमावबंदी आदेश जारी केले आहेत. हा आदेश संपूर्ण लातूर जिल्ह्याच्या हद्दीत २६ नोव्हेंबर, २०२४ रोजीच्या ००.०१ वाजेपासून ते १० डिसेंबर, २०२४ रोजीच्या २४.०० वाजेपर्यंत (दोन्ही दिवस धरुन) लागू राहील. शस्त्रबंदी व जमावबंदी काळात या आदेशान्वये शस्त्रे, सोटे, तलवारी, भाले, दंडे, बंदुका, सुरे, काठ्या, लाठ्या किंवा शारीरिक इजा करण्यासाठी वापरता येईल, अशी कोणतीही वस्तू सोबत घेऊन फिरता येणार नाही. कोणताही दाहक पदार्थ किंवा स्फोटक पदार्थ बाळगता येणार नाही, दगड किंवा इतर क्षेपणास्त्रे, सोडावयाची किंवा फेकावयाची उपकरणे बाळगणे किंवा जमा करणे किंवा तयार करण्यास मनाई राहील. व्यक्तीचे प्रेत, आकृत्या किंवा प्रतिमा यांचे प्रदर्शन करता येणार नाही. तसेच जाहीरपणे घोषणा करणे, गाणे म्हणजे वाद्य वाजविण्यास मनाई राहील. ज्यामुळे सभ्यता अगर नितीमत्ता यास धोका पोहोचेल अशा किंवा राज्याची सुरक्षितता धोक्यात येईल किंवा ज्यामध्ये उलथवून टाकण्याची प्रवृत्ती दिसून येत असेल अशी आवेशपूर्ण भाषणे, हावभाव करणे, सोंग आणणे, चित्रे, चिन्हे फलक किंवा इतर कोणत्याही जिन्नस किंवा वस्तू तयार करणे, त्यांचे प्रदर्शन किंवा प्रसार करणे यास मनाई करण्यात आली आहे. जिल्ह्यात सार्वजनिक शांतता व सुव्यवस्था राहण्यासाठी कोणत्याही रस्त्यांवर किंवा कोणत्याही एका ठिकाणी पाच किंवा अधिक व्यक्तींना एकत्र जमण्यास, मिरवणूक काढण्यास मनाई करण्यात आली आहे. हा आदेश अंत्ययात्रा, विवाह, कामावरील पोलीस किंवा इतर शासकीय अधिकारी, कर्मचारी यांना लागू राहणार नाही. तसेच शस्त्रबंदी व जमावबंदी काळात सभा, धार्मिक मिरवणूक, मोर्चा, उपोषण यांना परवानगी देण्याचे सर्व अधिकार हे पोलीस अधीक्षक, पोलीस उपअधीक्षक व संबंधित पोलीस निरिक्षक, पोलीस उपनिरीक्षक यांना राहतील. त्यांनी परवानगी देण्यापूर्वी उपविभागीय दंडाधिकारी यांच्याशी सल्लामसलत करून परवानगी द्यावी, असे अधिसूचनेत नमूद करण्यात आले आहे.

## भोकर येथे शेर–ए–हिंद टिपू सुलतान यांच्या जयंती निमीत्त भव्य रक्तदान शिबीर

भोकर– शेर–ए–हिंद हजरत टिपू सुलतान यांच्या जयंती निमीत्त भोकर येथे अक्सा ग्रुप फाउंडेशन च्या वतीने रक्तदान शिबिर घेऊन अभिवादन करण्यात आले. या शीबीरात अनेक रक्तदात्यांनी रक्तदान केले आहे.



भोकर येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नियोजित पुतळ्या जागे ठिकाणी दिनांक २७ नोव्हेंबर २०२४ रोजी शेर–ए–हिंद हजरत टिपू सुलतान यांच्या जयंतीनिमित्त येथील अक्सा ग्रुप फाउंडेशन च्या वतीने भव्य रक्तदान शिबीराचे आयोजन करण्यात आले.

या रक्तदान शिबिरात अनेक रक्तदात्यांनी रक्तदान करून शेर ए– हिंद टिपू सुलतान यांना अभिवादन केले.

कार्यक्रमास भारतीय बौद्ध महासभा शाखा भोकर शहराध्यक्ष साहेबराव मोरे, मौलाना मुबीन खान इनामदार, वंचित चे तालुकाध्यक्ष दिलीप राव,काँग्रेसचे बाबाखान पठाण, काँग्रेसचे शहराध्यक्ष तौसीफ इनामदार, संदीप पाटील गौड, सय्यद जुनेद, शेख आशू, पत्रकार सिद्धार्थ , सुभाष भालेराव, असलम इनामदार, माजीद शेख पटेल यांची प्रमूख उपस्थीती होती.यावेळी प्रथम भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर व शेर–ए– हिंद हजरत टिपू सुलतान यांच्या प्रतिमेचे मान्यवरांच्या हस्ते पुजन करण्यात आले.

यावेळी बोलताना काँग्रेसचे शहराध्यक्ष तौसीफ इनामदार म्हणाले की हजरत टिपू सुलतान यांचा देशावर राज्य करणाऱ्या इंग्रजा विरुद्धचा लढा, देशाच्या स्वातंत्र्यासाठीचे बलिदान प्रत्येक देशवासियांसाठी प्रेरणादायी व कायम स्मरणात राहणारे आहे. आजच्या युवकांनी हजरत टिपू सुलतान यांचे विचार व त्यांचे कार्य कायम डोळ्यासमोर ठेवून त्यांचे आदर्श घेतले पाहिजे असे प्रतिपादन त्यांची केले.

भव्य रक्तदान शिबिर व कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी अक्सा ग्रुप फाउंडेशनचे नांदेड जिल्हाध्यक्ष मोबिन खान इनामदार, भोकर तालुका अध्यक्ष खाजा सोहेल इनामदार, इब्राहिम शेख,मोईज भाई बागवान, जमियत उलेमा हिंद उपाध्यक्ष नांदेड सलमान फरुखी, अरबाज पठाण,फैजान फारुखी,सय्यद जुनेद,अखिब इनामदार आदिंसह अनेकांनी परिश्रम घेतले.

या रक्तदान शिबिरात रक्त संकलन करण्यासाठी क्रिसेंट ब्लड बँक नांदेड व यांचे कर्मचारी महमद सोहेल, रवी देशमाने, भुवनेश्र्वर पांचाल, शेख इरफान, शेख अफरोज, बालाजी आडेपवार आदी उपस्थित होते.

## मी बाहेरुन पाठिंबा देण्यास तयार, एकनाथ शिंदेंनी भाजपला निरोप धाडल्याची चर्चा

मुंबई :महाराष्ट्र विधानसभेच्या निवडणुकीत महायुतीला घवघवीत यश मिळालं. यानंतर आता राज्याचा मुख्यमंत्री कोण होणार, याबाबत सर्वांना उत्सुकता लागली आहे. भाजप आणि शिवसेना शिंदे गटाकडून मुख्यमंत्रिपदावरुन जोरदार रस्सीखेंच सुरु आहे. मात्र देवेंद्र फडणवीस यांच्या गळ्यात मुख्यमंत्रिपदाची माळ पडणार हे जवळपास निश्चित झालं आहे.

एकनाथ शिंदे आणि भाजपच्या वरिष्ठ नेत्यांमध्ये मुख्यमंत्रिपदावरुन चर्चा सुरु असल्याची माहिती मिळत आहे. याचदरम्यान, एकनाथ शिंदे यांनी भाजपला नवा प्रस्ताव फॉर्म्युला दिला आहे. देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री झाल्यास एकनाथ शिंदे सरकारमध्ये सहभागी होऊ इच्छित नाही. मी बाहेरुन पाठिंबा देण्यास तयार आहे, असा निरोप एकनाथ शिंदेंनी भाजपच्या वरिष्ठांपर्यंत पोहचवला असल्याचा दावा करण्यात येत आहे. मात्र या दाव्यात किती तथ्य आहे, याबाबतही राजकीय वर्तुळात चर्चा रंगली आहे. एकनाथ शिंदे यांनी भाजपला नवा प्रस्ताव फॉर्म्युला दिला आहे. मात्र एकनाथ शिंदे यांचा प्रस्ताव भाजपला मान्य नसल्याचं सांगण्यात येत आहे. एकनाथ शिंदे यांनी सरकारमध्ये राहावे अशी भाजपची इच्छा आहे. याबाबत एकनाथ शिंदे आणि भाजप हायकमांडची चर्चा देखील सुरु असल्याचं बोललं जात आहे.

एकनाथ शिंदे यांना भाजपच्या केंद्रीय यंत्रणेकडून दोन ऑफर–राज्याचे काळजीवाहू मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना भाजपच्या केंद्रीय यंत्रणेकडून नेते मंडळीकडून दोन ऑफर देण्यात आल्याच्या चर्चा राजकीय वर्तुळात आहेत. त्यात पहिलं म्हणजे की उपमुख्यमंत्री पद देण्यात येईल आणि दुसरं म्हणजे केंद्रात स्थान देण्यात येईल. एका इंग्रजी वृत्तपत्राने दिलेल्या बातमीप्रमाणे एकनाथ शिंदे यांच्याकडून उपमुख्यमंत्रीपदासाठी वेगळी नावं सुचवलं जाण्याची शक्यता आहे. या ऑफरनंतर मुख्यमंत्र्यांनी भेटी–गाठी टाळल्या आहेत. त्यामुळे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे नवीन तयार होणाऱ्या सरकारमध्ये दिसणार की नाही हया प्रश्नावर चर्चा राजकीय वर्तुळात रंगू लागल्या आहेत.

एकनाथ शिंदे यांनी मौन बाळगले –२३ तारखेनंतर एकनाथ शिंदे यांनी मौन बाळगले आहे का असा प्रश्न निर्माण होतोय. कारण एकत्रित झालेल्या प्रेस कॉन्फरन्स नंतर एकनाथ शिंदे यांनी माध्यमांशी बोलणे तसे टाळले आहे, तसेच आमदार, खासदार यांच्या भेटी देखील त्यांनी टाळल्या आहेत, त्यांच्या मौनाचे नेमके काय कारण हे कळू शकले नसले तरी एकनाथ शिंदे नाराज असल्याची चर्चा आहे.

# स्टँड अप इंडिया अंतर्गत अनुसूचित जाती व नवबौध्द समाजातील मार्जिन मनी योजना

लातूर : केंद्र शासनाच्या स्टँड अप इंडिया योजनेत अनुसूचित जाती व नवबौध्द समाजाच्या घटकांकरिता मार्जिन मनी योजना सुरु करण्यात आलेली आहे. या योजनेच्या मार्गदर्शक सूचना शासन निर्णय ९ मार्च, २०२० रोजीच्या शासन निर्णयाद्वारे शासन स्तरावरुन निश्चित करण्यात आलेल्या आहेत. हा शासन निर्णय शासनाच्या .ारहरीरीहींर.सीं.ळप या संकेतस्थळावर निरीक्षणासाठी उपलब्ध आहे. या योजनेकरिता नवउद्योजक इच्छूक लाभार्थ्यींनी सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण कार्यालय लातूर यांच्याकडे शासन निर्णयातील नमूद करण्यात आलेल्या सर्व अटी व शर्तींची पूर्तता करुन करावा. ३१ डिसेंबर, २०२४ पूर्वी सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण कार्यालय, लातूर यांच्या कार्यालयात आपला प्रस्ताव सादर करावे, असे आवाहन समाज कल्याण सहाय्यक आयुक्त एस.एन. चिकुर्ते यांनी केले आहे.

### साईबाबा संस्थानवर नव्याने विश्वस्त मंडळ येणार; राज्यमंत्रिपदाचा दर्जा असलेल्या साई संस्थानच्या अध्यक्षपदी कोणाची वर्णी?

शिर्डी : राज्याचा मुख्यमंत्री कोण होणार याकडे सर्वांचेच लक्ष लागून राहिलेलं असतानाच देशातील नंबर दोनचे श्रीमंत देवस्थान असलेल्या शिर्डी साईबाबा संस्थानवर विश्वस्त मंडळ येणार का ? याचीही उत्सुकता सगळ्यांना लागलीय. राज्यात आता भाजपा महायुतीचे सरकार आल्याने साई संस्थानच्या अध्यक्षपदाची माळ कोणाच्या गळ्यात पडणार याकडे सर्वांचे डोळे लागून राहिले आहेत. साई संस्थानाच्या स्थापनेला १०० वर्षे पूर्ण : श्रद्धा अन् सबुरीचा मंत्र देणाऱ्या शिर्डीतील साईबाबांच्या साई संस्थानाच्या स्थापनेला १०० वर्षे पूर्ण झालीत. दरम्यान २०१२ ते २०२४ या १२ वर्षांच्या कालावधीत २०१८ शताब्दी वर्षात भाजपा-सेना युतीच्या सरकारमध्ये तत्कालीन अध्यक्ष सुरेश हावरे यांना विश्वस्त मंडळाचा जेमतेम ३ वर्ष कारभार चालवता आलाय. तसेच २०२१ मध्ये महाविकास आघाडी सरकारमध्ये कोपरगावचे आमदार आशुतोष काळे यांच्या नेतृत्वात विश्वस्त मंडळाला दीड वर्ष काम करता आलेलं आहे. त्यामुळे त्यांना पुरेसा वेळ मिळालेला नाही. साईबाबा संस्थानचा कारभार त्रिसदस्य समिती संस्थानकडे : सुरेश हावरे यांच्या कार्यकाळात मोठ-मोठ्या घोषणा झाल्या, परंतु त्या सत्यात उतरल्याचे आतापर्यंत दिसून आलेलं नाही. दोन्ही विश्वस्त मंडळाचा हा चार-साडेचार वर्षांचा कालावधी वगळला तर आतापर्यंत साईबाबा संस्थानचा कारभार त्रिसदस्य समिती संस्थान पाहत आहे. राज्यात नुकत्याच पार पडलेल्या विधानसभा निवडणुकीत भाजपा, राष्ट्रवादी, शिवसेना महायुतीला जनतेने भरभरून मते देऊन सत्तेत महायुतीचे सरकार आणलंय. मागील अडीच वर्षांच्या कालखंडात महायुती सरकार असताना साई संस्थानवर विश्वस्त मंडळाची नियुक्ती होणे अपेक्षित होते. मात्र तसे काही झाले नाही. त्याबरोबरच एसटी महामंडळ वगळता इतर महामंडळावर ही नव्याने निवड झालेली नाही. त्यामुळे आंतरराष्ट्रीय तीर्थक्षेत्र असलेल्या शिर्डी येथील साईबाबा संस्थानवर कोणाची वर्णी लागते हे पाहणं महत्त्वाचं ठरणार आहे. विश्वस्त मंडळात एकूण १५ सदस्य : वर्ष १९२२ साली साई संस्थान स्थापनेवेळी विश्वस्त मंडळात एकूण १५ सदस्य होते. तर भक्त मंडळात २३२ सदस्यांचा समावेश होता.

# धनखडजी, यांना त्यांना सांगा की !

## संपादकीय...

काल भारतीय संविधानाला ७५ वर्ष पूर्ण झाल्यामूळे दिल्ली संसद सभागृहा मध्ये जो उत्साह साजरा करण्यात आला, त्यावेळी भारताच्या राष्ट्रपती असलेल्या द्रोपदी मुर्मू यांनी भारतीय संविधान दिनाचे औचीत्य साधून जे कांही महात्मे स्पष्ट केले, त्यावेळी भारताचे पहिले राष्ट्रपती राजेंद्र प्रसाद, आणि भारतीय राज्य घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्यकतृत्वावर भाष्य केले. त्यावेळी उपराष्ट्रपती तथा राज्य सभेचे सभापती जगदीप धनखड यांनी भारतीय राज्य घटना प्रदान करताना डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी स्वतंत्र भारताचा राज्य कारभार करताना, समाजवाद, धर्मनिरपेक्षता, आणि पंथा विरोधी राजकारण केल्यास स्वतंत्र भारतासह लोकशाहीला धोका होईल त्यामुळे जात, धर्म, आणि पंथा पासून दुर राहाणे गरजेचे असते, हे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे उद्‌गार उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांनी संविधान दिनाच्या निमित्ताने दिल्लीत आयोजीत केलेल्या कार्यक्रमात स्पष्ट केले. परंतू हीच भाषा उपराष्ट्रपतीनी सत्ताधारी आणि विरोधकांना सांगावे अशीच कुजबूज सर्वसामान्यतून होत असून मग हे कांही सारे यानां, त्यांना सांगा ना, अशीच प्रतिक्रिया उमटताना दिसते आहे.

कालपरवाच्या सर्वोच्च न्यायालयाच्या प्रकरणातून निकाल वजा निर्णय देताना कोणा एका सरकट भाजपा खासदार विरोधात सर्वोच्च न्यायालयाने भारतीय संविधानातील जे कांही विधाने आहेत, ते रद्द करता येत नाहीत, असे स्पष्ट करुन त्या भिकारचोट खासदाराला तंबी दिली होती, त्या आव्हाणानुसार भितीखातर मनावे किंवा वैचारीक दृष्टया सावध होवून उपराष्ट्रपती जगदीपजी यांनी जे कांही विधान केले ते महत्वाचे वाटावे कारण संविधान दिनाच्या निमित्ताने राष्ट्रपती द्रोपदी मुर्मू यांनी भारताचे पहिले राष्ट्रपती डॉ. राजेंद्र प्रसाद यांचा गवगवा केला, पंरतू भितभित भारतीय राज्य घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नावाचा उल्लेख न कळत केला. पंरतू उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांनी सरळपणे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या भाषणाचा उल्लेख करुन भारतीय जनतेला सावध केले. पंरतू त्याच क्षणी उपस्थित प्रेक्षकातून जगदीपजी हे तूमचे म्हणने याना, त्यांना सांगा की, अशी कुजबूज होत होती, ती निराधार नसावी असे वाटते.

प्रधान मंत्री नरेंद्र मोदीने छाती बडवून संविधान, संविधान, बाबासाहेब, बाबासाहेब म्हणून गळा चिरे पर्यत नौटंकी करतात पंरतू मी नाही त्यातली, कडी लावा आतली, म्हणून भारतीय राज्य घटनेतील एक एक कलम, कलम दुरुस्तीच्या निमित्ताने घटनेतील एक एक अनुछेद नष्ट करीत आहेत, त्यात भिकार मारवाडी त्यास सहमती देतो आहे, त्यामूळे अशा लोकांना उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांनी समुपोदेशन करण्याची गरज वाटते. त्यामूळे बाबासाहेबांच्या विधानाचा वापर करुन स्वत:ची महत: वाढविण्यापेक्षा कृतीशिल उद्देशाने अजुबाजूच्या, समोरच्या, लोकप्रतिनिधीना वास्त काय ते सांगावे, यापेक्षा दुसरा कोणताही न्यायीक उपकृम असू शकत नाही, अशीच कुजबूज राजकीय वर्तूळात होताना दिसते आहे.

वास्तविक पाहाता मनात नसताना ही प्रधान मंत्री नरेंद्र मोदी यांनी नाईलाजाने संसद भवनात भारतीय राज्य घटनेचा संविधान दिन म्हणून कार्यक्रम आयोजीत केला, त्यात आदीवाशी समाजाच्या असलेल्या राष्ट्रपती द्रोपदी मुर्मू यांना महत्वाचे स्थान दिले, पंरतू त्यांनी ही राष्ट्रीय स्वंय सेवक संघ आणि भाजपाच्या नेत्याशिवाय कोणाला ही संभाषणाची संधी दिली नाही. कॉंग्रेसचे लोकसभेतील विरोधी पक्ष नेते, राहुल गांधी, आणि राज्य सभेचे विरोधी पक्ष नेते मल्लिकार्जून खरगे हे निमंत्रीत सदस्य असताना ही, त्यांना बोलण्याची संधी दिली नाही,आणि भाजपाचे घटक पक्ष मित्र असलेले रामदास आठवले यांना तर कुठल्याकोठे नेवून ठवले, हे कोणाला ही कळलेच नाही, हा भेदभाव कशासाठी असा प्रश्न चर्चीला जात असून भारतीय संविधानातील सामाजीक न्याय, समानता, स्वातंत्र्य, न्याय, हक्क व लोकशाहीची स्पष्ट भावना आणि उद्देश कोठे मुरतात, याचे स्पष्टीकरण लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला हे स्पष्ट करतील काय म्हणूनच उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांनी आजूबाजूच्या, समोरच्या आणि पाठिमागच्या लोकप्रतिनिधीना भारतीय संविधान आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचारधन समजून सांगावे एवढेच.

# महात्मा जोतीराव फुले

भारताचे थोर सुपुत्र, विचारवंत, समाजसुधारक, लेखक महात्मा जोतीराव फुले यांचा आज स्मृतिदिन. महात्मा जोतीराव फुले यांचा जन्म ११ एप्रिल १८२७ रोजी झाला. जोतीरावांच्या वडिलांचे नाव गोविंदराव तर आईचे नाव चिमणाबाई असे होते. सातारा जिल्ह्यातील कटगुण हे त्यांचे मूळ गाव. त्यांचे आडनाव गोऱ्हे असे होते पण त्यांच्या वडिलांचा फुले विक्रीचा व्यवसाय होता त्यामुळे ते फुले म्हणूनच ते ओळखले जाऊ लागले पुढे फुले हेच आडनाव रूढ झाले. काही दिवसांनी कटगुणहुन त्यांचे कुटुंबीय पुरंदर तालुक्यातील खानवडी येथे आले. खानवडी येथे त्यांचे घर असून त्यांच्या नावे सात बाराचा उतारा देखील आहे. प्राथमिक शिक्षण पूर्ण झाल्यानंतर त्यांनी भाजी विक्रीचा व्यवसाय केला. जोतीराव फुले यांना लहानपणापासून शिक्षणाची आवड होती. १८४२ साली त्यांनी पुण्याच्या स्कॉटिश मिशन हायस्कूलमध्ये माध्यमिक शिक्षण घेण्यासाठी प्रवेश घेतला. अतिशय तल्लख बुद्धीच्या जोतिरावांनी पाच सहा वर्षातच तो अभ्यासक्रम पूर्ण केला. २३ सप्टेंबर १८७३ रोजी महात्मा फुले यांनी सत्यशोधक समाजाची स्थापना केली. तथाकथित सनातनी उच्चवर्णीय लोकांकडून सर्वसामान्य लोकांवर होणारा अन्याय अत्याचर दूर करणे तसेच गुलामगिरीतून शूद्रातिशूद्र समाजाची मुक्तता करणे व त्यांना त्यांच्या हक्काची जाणीव करुन देणे हे सत्यशोधक समाजाचे ध्येय होते. 'सर्वसाक्षी जगत्पती। त्याला नकोच मध्यस्ती।। ' हे या समाजाचे घोषवाक्य होते. सत्यशोधक समाजाने गुलामगिरीविरुद्ध आवाज उठवला आणि समाज न्यायाची व सामाजिक पुनर्रचनेची मागणी केली. या समाजातर्फे पुरोहितांशीवाय लग्न लावण्यास सुरवात केली. मराठीत मंगलाष्टके रचली. समाजातील तळागाळातील लोकांपर्यंत शिक्षण पोहचवणे हे सत्यशोधक समाजाचे महत्वाचे ध्येय होते. महात्मा फुले यांनी एका कवितेत शिक्षणाचे महत्व पटवून देताना म्हटले आहे की

विद्येविना मती गेली ।  
मतिविना नीती गेली।  
नितीविना गती गेली ।  
गतिविना वित्त गेले ।  
वित्ताविना शूद्र खचले ।  
इतके अनर्थ एका अविद्येने केले ।।

एक महिला शिकली तर संपूर्ण कुटुंब शिकते. समाज शिक्षित करायचा असेल आणि बहुजन समाजात शिक्षण मुहूर्तमेढ रोवयची असेल तर महिलांना शिक्षित व्हायलाच हवे असे त्यांचे मत होणे म्हणूनच त्यांनी त्याची सुरवात स्वतःच्या घरापासून केली. जोतिरावांनी त्यांच्या पत्नी सावित्रीबाईंना शिक्षण देऊन शिक्षण कार्यास प्रवृत्त केले. महात्मा



फुले यांनी १९४८ साली पुण्यातील भिडे वाड्यात मुलींची पहिली शाळा काढून तेथील शिक्षिकेची जबाबदारी सावित्रीबाईंवर सोपवली. पुढे सावित्रीबाई या शाळेच्या मुख्याध्यापिकापदी आरूढ झाल्या. शाळेच्या मुख्याध्यापकपदी आरूढ झालेली भारतातील पहिली महिला म्हणजे सावित्रीबाई फुले त्याचप्रमाणे मुलींसाठी पहिली शाळा काढणारे पहिले भारतीय म्हणजे महात्मा जोतीराव फुले. महात्मा जोतीराव फुलेंनी देशात मुलींच्या शिक्षणाची मुहूर्तमेढ रोवली. आज सर्वच क्षेत्रात महिला आघाडीवर आहेत असे कोणतेच क्षेत्र नाही की ज्यात महिलांनी आपला झेंडा रोवला नाही. कला, क्रीडा, साहित्य, विज्ञान, तंत्रदान, शिक्षण, समाजकारण, राजकारण, अर्थकारण अशा सर्वच क्षेत्रात महिला आघाडीवर आहेत त्या केवळ आणि केवळ फुले दाम्पत्यांमुळे. महिलांसाठी फुले दाम्पत्यांनी जे काय केले ते ३३ कोटी देवांनीही केले नाही. महात्मा फुले यांनी पुण्यातील वेताळ पेठेत १८५२ साली अस्पृश्यांसाठी शाळा स्थापन केली. त्यांच्या या शैक्षणिक कार्याला सनातन्यांनी खूप वविरोध केला. मुलींनी शिक्षणासाठी घराबाहेर पडणे म्हणजे धर्म बुडणे अशी आरोळी ठोकत सनातनी लोकांनी महात्मा फुले यांच्या या महान कार्यास विरोध केला. त्यांना मारण्यासाठी मारेकरी पाठवले पण महात्मा फुले डगमगले नाहीत. ते आपल्या भूमिकेवर ठाम राहिले. महात्मा जोतीराव फुले यांना वाचनाची खूप आवड होती. विवीध महापुरुषांचे जीवनचरित्र वाचणे व त्यातून प्रेरणा घेणे हा त्यांचा आवडीचा छंद. छत्रपती शिवाजी महाराजांचे चरित्र व थॉमस पेन या विचारवंतांच्या राईट ऑफ थॉट्स या ग्रंथाचा त्यांच्यावर खूप प्रभाव पडला. बहुजन समाजातील अज्ञान, अंधश्रद्धा आणि दारिद्य पाहून ते खूप अस्वस्थ होत. जातपात, अस्पृश्य- स्पृश्य भेदभाव पाहून त्यांना खूप राग येत. समाजातील अज्ञान अंधश्रद्धा दूर करून समाजातील जातीभेद नष्ट करण्याचा त्यांनी निश्र्चय केला. कोणताही धर्म ईश्र्वराने निर्माण केलेला नाही आणि चातुर्वर्ण्य व जातीभेद ही निर्मिती मानवाचीच आहे असे त्यांचे रोखठोक मत होते. सर्व मानव एकच आहेत म्हणून सर्वांनी गुण्यागोविंदाने राहावे असे त्यांचे मत होते. त्यांनी लिहिलेल्या शेतकऱ्यांचा आसूड या पुस्तकातून महाराष्ट्रातील शेतकऱ्यांची विदारक दुर्दशा आणि दारिद्र्याची वास्तवता विशद केली आहे. या पुस्तकाद्वारे विशाल दृष्टिकोनाचे क्रांतिकारक म्हणून महात्मा फुलेंचे दर्शन होते. महात्मा फुले यांनी सार्वजनिक सत्यधर्म हा ग्रंथ लिहिला. हा ग्रंथ सत्यशोधक समाजाचा प्रमाण ग्रंथ मानला जातो. तुकारामांच्या अभांगाचा त्यांना गाढा अभ्यास होता. अभंगाच्या धर्तीवर त्यांनी अनेक अखंड रचले. त्यांना सामाजिक विषमतेचे जागतिक भान होते म्हणूनच आपला गुलामगिरी हा ग्रंथ त्यांनी अमेरिकेतील कृष्णवर्णीयांना समर्पित केला. अस्पृश्यांची कैफियत हा त्यांचा अप्रकाशित ग्रंथ आहे. २८ नोव्हेंबर १८९० रोजी महात्मा फुले यांचे निधन झाले. आज त्यांच्या स्मृतिदिनी त्यांचे स्मरण करणे हे आपले कर्तव्यच आहे. महात्मा फुलेंना स्मृतिदिनी विनम्र अभिवादन!

**श्याम ठाणेदार**  
**दौंड जिल्हा पुणे**  
**९९२२५४६२९५**

# शिक्षण हे परिवर्तानाचे हत्यार आहे : महात्मा फुले

एकविसाव्या शतकाकडे नजर लावून बसलेल्या भारतात शिक्षण तळागाळापर्यंत पोहचू शकलेलं नाही हे वस्तुस्थिती नाकारता येत नाही. आजही समाजात हक्कांची जाण आहे. पण कर्तव्याचा विसरच पडला आहे. आजही दीनदुबळे दलित अन्याय सोसतच आहेत. परहिता साठी अष्टाप्रहर राबणारा, झिजणारा शेतकरी, कामकरी, श्रमजीवी आजही दारिद्र्याचे आणि अन्यायाचे चटके अनुभवतच वाटचाल करत आहे. शहरे सोडली तर आजही खेडोपाडी, डोंगरी भागात छोटी छोटी मुलं कामाला जुपली जात असल्यानं शिक्षणाला वंचितच आहेत. शांतता वर्षातही शांतता औषधालाही नाही. उलट जिकडे तिकडे द्वेषाचे, विद्रोहाचे अशांत वातावरण खदखदत आहे. आजही साक्षरतेचे प्रमाण फारच कमी आहे. महात्मा फुल्यांनी अस्पृश्य मुलांसाठी शाळा काढली आणि ज्ञानांच दालन त्यांच्यासाठी खुले केले हे जरी खरे असले तरी विषमता आणि जातीभेद यांना आज देखील पूर्णपणे मुठमाती मिळू शकलेली नाही, ही वास्तविकता आहे.

शिक्षणाचा प्रसार जर तळागाळापर्यंत झाला तरच क्रांती होईल असं तर ''विद्येविना मती गेली, मतीविना निती गेली नीतीविना गती गेली गतीविना वित्त गेले आणि वित्तविना शुद्र खचले''. शंभर वर्षापूर्वीची हिच स्थिती आजही आहे. माणसाच्या समुद्रात आज माणुसकीच हरवली आहे. सामाजिक आणि आर्थिक विषमता याचं आजही पूर्णपणे उच्चाटन झालेले नाही. बंधुभाव फक्त ओठातच आहे. अशी स्थिती पाहिल्यावर महात्मा फुल्यांसारखी माणसं का बरं अस्वस्थ होणार नाहीत. आज जर महात्मा फुले आपल्यात असते तर त्यांनी आपल्या परखड विचारांच्या पवित्र्यांनी द्वेष, भ्रष्टाचार, अन्याय, दरिद्रय यांचा अंध:कार दूर करायचा नक्कीच प्रयत्न केला असता. आणि मग या विषयावर बोलायचा कदाचित प्रसंगही आला नसता.

हिंदू समाजातल्या मतलबी रुढींचा त्यांना तिरस्कार वाटू लागला. ज्योतिबांने शाळेतला अभ्यासक्रम पूर्ण करतांनाच १८४७ पर्यंत ज्योतिबा बुध्दिने चांगले प्रौढ झाले होते. त्यांनी समाजाचे बारकाईने निरीक्षण केले. त्यातून त्यांच्या असे लक्षात आले की, आपला हिंदु समाज जातीभेदाने आणि विशिष्ट वर्गाच्या गुलामगिरीत राहिल्याने प्रतिगामी बनला आहे. स्त्रियां आणि शुद्रांची कुचंबना होत आहे. हे सर्व स्त्रियां आणि बहुजन समाज शिक्षणापासुन दुर राहिल्यामुळे घडत आहे, असे त्यांच्या निदर्शनाला आले. त्यावरुन त्यांनी भावी जीवनातील कार्याची दिशा ठरविली. ते सरकारी नोकरीच्या मागे न लागता समाजकार्य करायचे ठरवून कामाला लागले. सामाजिक गुलामगीरी दूर करणे आणि सर्वांना शिक्षणाची दारे खुली करणे त्यासाठी प्रयत्नशील राहणे हे त्यांच्या जीवनाचे ध्येय ठरले.

हे कार्य तत्कालीन रुढीप्रिय समाजाला रुचले नाही. मुलींची शाळा काढण्यासाठी पूर्व तयारी म्हणून त्यांनी आपल्या पत्नीला प्रथम शिक्षण दिले. सावित्रीबाईंनी ही आपल्या पतीच्या जीवन कार्याला मनापासून सहाय्य केले. १८४८ मध्ये पहिली १८५१ मध्ये दुसरी आणि १८५२ मध्ये तिसरी मुलींची शाळा काढली. या शाळा व्यवस्थित चालू लागल्या. मेजर कॅंडी यांनी सरकारतर्फे ७५ रुपये अनुदान मंजुर केले. फुले यांच्या या महान सामाजिक कार्याचा गौरव म्हणुन त्यांचा सत्कार ही करण्यात आला. या नंतर ज्योतिबांनी सामाजिक सुधारणेकडे विशेष लक्ष द्यायचे ठरविले. व्यक्ति स्वातंत्र्य, समता आणि बुध्दि प्रामाण्य यासाठी ते झगडू लागले. सतीची प्रथा, विधवा पूर्नविवाह, भृणहत्या (लहान मुलांची हत्या) या समाज विघातक गोष्टींना त्यांनी विरोध केला. केवळ शाब्दिक विरोध न करता त्यांनी पुढाकार घेवून ''बालहत्या प्रतिबंधगृह'' ही संस्था सुरु केली. समाजस्पृश्य-अस्पृश्य असा भेदाभेद पाळणाऱ्याचा रोष पत्करुन त्यांनी आपल्या घरी असलेला पाण्याच्या हौद सर्वांना म्हणजे अस्पृश्यांनाही खुला केला.

शिक्षण हेच समाज परिवर्तनाचे प्रभावी माध्यम आहे, हे लक्षात येताच अस्पृश्यासाठी, स्त्रियांसाठी त्यांनी शाळा उघडल्या, अनाथाश्रम काढले, वृत्तपत्र काढले. धर्म जन्माने न मिळता माणसाच्या स्वत:च्या बुध्दीने स्विकारला पाहिजे. शेतकयांच्या व्यथा इंग्रज प्रशासनाच्या कानी पोहोचविल्या.शेतकरी हा समाजाचा कणा आहे. पोशिंदा अन्नदाता आहे, असे मत मांडले आणि जगजागृती केली. त्यांच्या साठाव्या वर्षी जनतेने मुंबईस त्यांचा नेत्रदिपक सत्कार करुन त्यांना ''महात्मा'' ही पदवी बहाल केली. सामाजिक समता, आर्थिक न्याय व शोषणमुक्ती यासाठी ज्योतिबाने अखेरच्या क्षणापर्यंत प्रयत्न केले. त्यांच्या पुरोगामी विचारांना कृतीची जोड मिळाली जणू ती मानवतेच्या कणवतेची बैठक होती. ज्योतिबांच्या कृतीमुळे, कर्तृत्वामुळे या समाजाची नवी पहाट उदयास आली. सावित्रीमाई भारतातील आद्यकांतीकारी थोर स्त्री होती. ज्योतिबांना सावित्रीमाईची सक्रीय साथ लाभली. सामाजिक सुधारणेची सुरुवात आपल्या घरापासुन करणारे ज्योतिबाफुले सारखे समाजसुधारक युगात होणे अशक्य आहे. सुधारकाग्रणी, संपूर्ण महाराष्टाचे भुषण, सुधारकांचे सुधारक त्यांच्या विचारांनी आणि धाडसी वृत्तीने कृत्तीने समाजाला जागे केले. काळाच्या खूप पुढे जाण्याचे सामर्थ्य त्यांच्यात होते. हीन-दीन-जीवांना एकोणिसाव्या शतकात त्यांनी आपल्या विशिष्ट ध्येयासाठी आपले संपूर्ण जीवन समर्पित केले.

मानवी सामाजिक सुधारणेचे अवलोकन केले, परिस्थितीचे अवलोकन केले आणि प्रकाशमय मानवी स्वातंत्र्याच्या दिव्य युगाकडे सामाजिक माणसाच्या नवयुगाची ग्वाही देणारा आधुनिक भारतातील पहिला समाजक्रांतीकारक क्रांतिबा ज्योतिराव फुले नावाचा धगधगता लाव्हा तयार झाला. कारण देशात जातीभेदाची सुनामी ऊफाळुन आली होती. त्यामुळे कोणी शुद्र नदीकाठावर वस्त्रधुत असता तेथे एखादा भट आला तर शुद्रास आपली सर्व वस्त्रे गोळा करुन भटाच्या अंगावर शिंतोडा येण्याचा संभव नाही, अशास्थळीजाऊन वस्त्रे धुवावी लागत. भटाच्या अंगावर नकळत पाण्याचा शिंतोडा उडालाच तर भटाने रागाने अग्नीसारखे तप्त होऊन आपल्या जवळचे जड भांडे शुद्रांच्या डोक्यावर मारावे, ब्राम्हणावर तर सावली सुध्दा पडू नये याची पूर्णपणे खबरदारी शुद्राने वस्तीतून वाट असेल त्या वाटेवरुन जाण्यास सुध्दा धोका पत्करु नये असा कायदा, अशा कायद्याचे राज्य होते, त्यामुळे राज्यात अनेक छळवाद होते. स्त्रियांना तर त्या रुढीने बंदीस्तच करुन ठेवले होते. पुरुषप्रधान व्यवस्थांच्या रणधुमाळी विषयी फुले म्हणतात की, स्त्री ही जात अबला असल्यामुळे तिच्यापूढे लोभी व धाडसी पुरुषांनी स्वत:चेच म्हणणे खरे केले आणि स्त्रीयांना मानवी हक्क समजू नयेत म्हणून पूर्ण अंधारात ठेवले. ज्योतिरावांना सावित्रीमाईंची भक्कम साथ मिळाल्यानंतर त्यांनी विचार केला की, हे आता शुद्र अतिशुद्रांचा छळवाद बदलला पाहिजे. त्यावेळे पासून स्त्री चळवळीचा जन्म झाला.

महात्मा फुले आज जरी आमच्यात नाहीत परंतु कर्तृत्वाच्या रुपाने ते निश्र्चितच आमच्यांत आहेत. कारण जे दुस-यांसाठी मरतात, तेच खया अर्थानं जगतात आणि आपल्या कार्यकर्तृत्वाच्या रुपानं अमर असतात, म्हणजेच आपल्यातच असतात. आता हे जर खंर असेल तर महात्मा फुले देखील कार्यरुपानं आपल्यातच आहेत, असं नाही का तुम्हाला वाटत? मला तर वाटतं, या विषयाच्या निमित्तानं ज्ञानज्योतीचं चरित्र आणि चारित्र्याचा आचार, विचार आणि उच्चाराचा जवळून परिचय व्हावा आणि आपण त्यांचे कार्य जोमानं, जिद्दीनं आणि निष्ठेनं करावं असंच बहुधा बहुतेकांना अपेक्षित असावं लौकिकर्थानं आज जरी महात्मा फुले आपल्यात नसले, तरी त्यांचे अलौकिक कार्य कलेकलेनं वाढतच राहणार आहे.आणि त्यांचे अस्तित्व तर नेहमीचे आपल्यात राहणार आहे.

ज्ञानज्योत प्रज्वलित केलेल्या ज्योतिबांना सामाजिक समता, मानवता, विवेक, विनय आणि नम्रता यावर प्रकाश टाकुन राष्ट्राला स्वायत्ततेच ध्येय गाठण्यासाठी गतिमान बनवायचं होतं. समाजजागरणाचा वसा घेतलेले स्त्रीशिक्षण आणि स्त्रीशक्ति जागृतीचा मंत्र निनादात ठेवणारे, आणि अस्पृश्यांबद्दल कणव आणि बंधुता बाळगणारे ज्योतिबा आज असते तर ! खरंच काय बरं वाटलं असतं त्यांना ? आजही समाजात समता आणि बंधुता पूर्णपणे उतरु शकली नाही हे पाहून ते नक्कीच अस्वस्थ झाले असते. जयंती आणि पुण्यतिथी या दोन दिवशी आपली आठवण ठेवणारे, याच दिवशी आपल्या पुतळयाला हार घालून खोटी पूजा करुन अवडंबर माजवणारे तथाकथित कार्यकर्ते आणि पुढारी पाहून त्यांना नक्कीच चीड आली असती.

६३ वर्षे चंदनासारखे झिजले. प्रवास केला, व्याख्याने दिली, लेख लिहिले. स्वातंत्र्य, समता, लोकशाही, विज्ञान, इहवाद या आधुनिक मुल्यांवर भर देऊन सामाजिक क्रांतीची प्रेरणा दिली. डॉ. आंबेडकरांनी त्यांना गुरु मानले. सहज सोप्या भाषेत नेमकी स्पष्टता आणणे त्यांना जमत असे. विचारांना कृतिशीलतेची जोड दिली. जैसे बोलावे, तैसे चालावे, मग महंतलीला स्वभावे, अंगी बाणे या समर्थवचनाची सार्थकता सिध्द करणारा हा महात्मा सर्व सुखाचे आगर नीतितत्त्वांचे माहेर अशा हया महात्म्याचे अविरत कष्टाने २८ नोव्हेंबर १८९० मध्ये अनंतात विलीन झाले, त्यांच्या स्मृतीस विनम्र अभिवादन !

**प्रविण बागडे**  
**नागपूर**  
**भ्रमणध्वनी : ९९२३६२०९१९**

# मराठी अभिजात भाषा चला ज्ञानभाषा करू या!' लेख स्पर्धा

मुंबई :अमृततुल्य, संतांची, ज्ञानवंतांची, कीर्तिवंतांची, शूरांची, वीरांची, विजिगीषू अशी आपली मराठी मायभाषा! या आपल्या अमृततुल्य मराठी भाषेस अभिजात भाषेचा बहुमान मिळणे हे सर्वच मराठीप्रेमींचे स्वप्न होते. यासाठी सर्वांनीच गेली बारा वर्षे सातत्याने प्रयत्न केले, केंद्राकडे पाठपुरावा केला. अखेर मराठी भाषेचा सन्मान होऊन ती जगाच्या पाठीवर जाण्यासाठी सज्ज झाली आहे. मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाला ही गौरवाची बाब आहे परंतु खऱ्या अर्थाने ती आज अभिजात राहिली आहे का? वाघिणीचे दूध म्हणून तत्कालीन समाजधुरिणांनी जिची शिफारस केली त्या इंग्रजी भाषेवर आताचे पालकही स्वार झाले आहेत. जागतिक संवादाची भाषा बनलेल्या इंग्रजीचे गारुड पालकांना मोहिनी घालताना दिसत आहे. यामुळे मराठी शाळांच्या अस्तित्वाचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. राज्यात १४७८३ मराठी शाळा बंद पडल्या आहेत. हे असेच सुरू राहिले तर...

अभिजात भाषेचा दर्जा मिळणं ही अभिमानाची गोष्ट आहे, पण हा मिळालेला दर्जा टिकविण्यासाठी प्रयत्न करणं त्याहून महत्त्वाचं ठरणार आहे. दोन हजार वर्षांहून अधिक काळाची समृद्ध साहित्यिक परंपरा असलेली मराठी भाषा आणि तिचे साहित्य आपल्या पुढच्या पिढींपर्यंत टिकवून ठेवणे ही आपली प्रत्येकाची जबाबदारी झालेली आहे.




वृत्रपत्रलेखकांच्या चळवळीतील प्रमुख संस्था सन २०२४ हे वर्ष अमृतमहोत्सवी सांगता वर्ष साजरा करीत असताना 'मराठी वृत्तपत्र लेखक संघ मुंबई', 'मराठी विचारधारा प्रतिष्ठान, गोरेगाव' तसेच गेली बारा वर्षे अमेरिकेत मराठी संस्कृती, साहित्य जपण्याचा आणि संवर्धनाचा प्रयत्न करणाऱ्या 'मराठी कल्चर अँड फेस्टिवल्स संस्थे'च्या अध्यक्षा ऐश्र्वर्या कोकाटे (लॉस एन्जेलिस) यांच्या संयुक्त विद्यमाने 'मराठी अभिजात भाषा चला ज्ञानभाषा करू या!' विषयावर राज्यस्तरीय खुली लेख स्पर्धा आयोजित केली आहे.

देशपरदेशातील मराठी भाषाप्रेमी, साहित्यिक, राजकारणी, कलावंत, खेळाडू, स्पर्धा परीक्षार्थी, शिक्षक-प्राध्यापक-विद्यार्थी यांनी यात भाग घ्यावा. या स्पर्धेची शब्दमर्यादा दोन हजार असून पहिल्या तीन विजेत्यांना सन्मानचिन्ह, प्रशस्तिपत्र आणि रोख रक्कम तसेच इतरांना सहभाग प्रमाणपत्र देण्यात येईल, असे संघाचे अध्यक्ष रवींद्र मालुसरे यांनी घोषित केले आहे. माहिती पत्रकासह अधिक माहितीसाठी स्पर्धा प्रमुख सुनील कुवरे ९१६७३६४८७० लहरश्रींरश्र१९४९सारळश्र.लो यांच्याशी संपर्क साधावा असे आवाहन प्रमुख कार्यवाह प्रशांत घाडीगावकर यांनी केले आहे.

# रोटरी क्लब ऑफ लातूर मिडटाऊनच्या वतीने चित्रकला स्पर्धेचे आयोजन

लातूर/प्रतिनिधी : रोटरी क्लब ऑफ लातूर मिडटाऊनच्या वतीने स्व.कांतीलाल कुचेरिया यांच्या स्मरणार्थ चित्रकला स्पर्धेचे आयोजन रविवार दिनांक १ डिसेंबर रोजी करण्यात आले आहे.

शहरातील प्राथमिक,माध्यमिक शाळातील मुलांसाठी या चित्रकला स्पर्धेचे आयोजन केले जाते.स्पर्धेचे हे तिसावे वर्ष आहे. क्लबमधील सर्व सदस्यांच्या सहकार्याने ही स्पर्धा घेतली जाते.

या स्पर्धेचे मुख्य प्रायोजक कुणाल सायकल वर्ल्ड यांच्याकडून स्पर्धेतील १२ विजेत्यांना १२ सायकल बक्षीस स्वरूपात देण्यात येणार आहेत.

स्टीम एज्युकेशन सेंटर आणि तिरुपती बॅटरी व प्रमोद सुपर मार्केट हे सहप्रायोजक आहेत.

दिनांक १ डिसेंबर २०२४ रविवार रोजी श्रीकिशन सोमानी विद्यालय कन्हेरी रोड ,बुद्ध गार्डन जवळ लातूर या ठिकाणी प्राथमिक गट पहिली ते चौथी सकाळी ९.३० ते १.३० पर्यंत तर पाचवी ते दहावी दुपारी १२ ते १.३० या वेळेत स्पर्धा होणार आहे. रोटरी कडून ड्रॉइंग शीट उपलब्ध करून दिला जाणार असून इतर साहित्य व पाण्याची बॉटल मुलांनी आणावयाची आहे.

पहिली ते दहावी पर्यंतच्या प्रत्येक वर्गासाठी एका सायकलसह ५ बक्षीसे ठेवण्यात आली आहेत. मूकबधिर मुलांसाठी एक आणि मुलींसाठी एक सायकल बक्षीस स्वरूपात देण्यात येणार आहे. सहभागी प्रत्येक विद्यार्थ्यास प्रमाणपत्र मिळणार असून या स्पर्धेस मुलांना घेऊन येणे व घेऊन जाण्याची जबाबदारी पूर्णपणे पालकांची आहे.

विद्यार्थ्यांनी शाळेच्या गणवेशात व शाळेच्या ओळखपत्रासोबत येणे अनिवार्य आहे. परीक्षक म्हणून शहरातील नामांकित शाळेतील कलाशिक्षक काम पाहणार आहेत.शहरातील सर्व शाळांनी दरवर्षी उत्तम प्रतिसाद दिल्यामुळे ही स्पर्धा ३० व्या वर्षात पदार्पण करीतआहे .अनेक मुलांची चित्रे राष्ट्रीय ,आंतरराष्ट्रीय स्तरावरील नियतकालीकात व रोटरी मॅगझिन मध्ये झळकली आहेत .

रोटरी क्लब ऑफ लातूर मिडटाऊन , रोट्रॅक्ट क्लब आणि इंट्रॅक्ट क्लबचे सर्व सदस्य आणि श्रीकिशन सोमाणी विद्यालयाचे सर्व शिक्षक आणि कर्मचाऱ्यांचे व लातुर पोलीस प्रशासनाचे स्पर्धा यशस्वीतेसाठी सहकार्य लाभणार आहे.

शहरातील शाळांना कला शिक्षकामार्फत कुपन वाटप झाली आहेत. ज्यांना कुपन भेटले नाहीत त्यांच्यासाठी स्पर्धेच्या दिवशी श्रीकिशन सोमाणी शाळेत कुपन उपलब्ध करून देण्यात येणार आहेत.शहरातील जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी या स्पर्धेत सहभाग नोंदवावा,असे आवाहन चित्रकला स्पर्धेचे प्रोजेक्ट चेअरमन रमेश चिल्ले व यश कुलकर्णी,पब्लिक इमेज डायरेक्टर श्रद्धानंद आपशेट्टी तसेच अध्यक्ष चेतन पंढरीकर,सचिव गिरीश पेन्सलवार यांनी केले आहे.

# महाराष्ट्राचे समृद्ध मंदिर वारसाः एक ऐतिहासिक चर्चासत्र मंदिर निर्मिती मागचा इतिहास समजून घेणे गरजेचे- प्रसिद्ध इतिहासकार डॉ. गो.ब. देगलूरकर

लातूर प्रतिनिधी : :मंदिर हे साधना व उपासनेचे केंद्र असले तरी या मंदिराचे निर्मिती मागचा इतिहास समजून घेणे गरजेचे आहे, मंदिर हे केवळ पूजास्थान नव्हे, तर ते आपल्या सांस्कृतिक ओळखीचे प्रतीक आहे. असे प्रतिपादन प्रसिद्ध इतिहासतज्ञ मंदिर व मूर्तीशास्त्राचे जेष्ठ अभ्यासक व डेक्कन अभिमत विद्यापीठाचे माजी कुलपती गो.बं.देगलूरकर यांनी व्यक्त केले. जागतिक वारसा सप्ताहाच्या निमित्त आयोजित एका राष्ट्रीय चर्चासत्रात, प्रसिद्ध इतिहासकार डॉ. गो.बं. देगलूरकर यांनी महाराष्ट्रातील मंदिरांच्या निर्मितीमागचा इतिहास उलगडून दाखवला. यावेळी बोलताना त्यांनी महाराष्ट्राचा इतिहास, मंदिर निर्मिती, मुर्तीचे प्रयोजन इत्यादी विषयावर सखोल मार्गदर्शन केले.

सांस्कृतिक कार्य विभाग महाराष्ट्र शासन पुरातत्व व वस्तुसंग्रहालय संचालनालय,मुंबई अंतर्गत सहायक संचालक,पुरातत्त्व विभाग,पुणे व इंडियन स्टुडंट कौन्सिल, महाराष्ट्र यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक १९ ते २५ नोव्हेंबर दरम्यान साजरा केल्या जाणाऱ्या जागतिक वारसा सप्ताह निमित्त राष्ट्रीय चर्चासत्राचे आभासी आयोजन दिनांक २५ नोव्हेंबर २०२४ रोजी करण्यात आले होते .

या राष्ट्रीय चर्चासत्राचा विषय महाराष्ट्राचा समृध्द वारसा हा होता. मार्गदर्शक म्हणून सुप्रसिद्ध इतिहासतज्ञ मंदिर व मूर्तीशास्त्राचे जेष्ठ अभ्यासक व डेक्कन अभिमत विद्यापीठाचे माजी कुलपती गो. बं देगलूरकर उपस्थित



होते तर अध्यक्षस्थानी मूर्तिशास्त्राचे ज्येष्ठ अभ्यासक प्रभाकर देव सर यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी बोलतांना प्रा.प्रभाकर देव सर यांनी मराठवाड्यातील मंदिरे व मूर्तीशास्त्र यांचा इतिहास उलगडून सांगताना मराठवाड्यातील व्यापार परंपरा व त्या अनुषंगाने भारताचा रोम या प्राचीन साम्राज्याशी येणारा सहसंबंध याविषयी आपले मत मांडले. प्राचीन महाराष्ट्रातील समृद्धता, व्यापारी मार्ग,व्यापारी नगरे याविषयी माहिती दिली.वस्तुसंग्रहालयांचे इतिहासातील व मानवी जीवनातील महत्त्व अधोरेखित करतांना संशोधकांच्या शंकाचे निरसन केले.

या प्रसंगी प्रा.डॉ शिला स्वामी व प्रा.सिमा घोलप यांनी शोध निबंध वाचन केले.प्रसिद्ध इतिहासकार व जेष्ठ तज्ञ मार्गदर्शकांच्या मार्गदर्शनामुळे हे चर्चासत्र फलदायी ठरले असे मत पुणे येथील पुरातत्व विभागाचे सहायक संचालक डॉ.विलास वाहणे यांनी व्यक्त केले तर या चर्चासत्रामुळे नव्याने इतिहासाची माहिती मिळाली असे मत माजी प्राचार्या मिता रामटेके यांनी मांडले. या राष्ट्रीय चर्चासत्रात इंडियन स्टुडंट कौन्सिलचे अध्यक्ष श्री ज्ञानोबा कदम यांनी सर्वांचे स्वागत केले. प्रा.माधुरी राऊत यांनी चर्चासत्राच्या आयोजनाचे प्रयोजन स्पष्ट करतांना इंडीयन स्टुडंट्स कौन्सिलच्या कार्याचा आढावा घेतला. मान्यवर डॉ.गो.बं.देगलूरकर यांचा परिचय डॉ सिमा शेटे यांनी तर डॉ. प्रभाकर देव सर यांचा परिचय प्रा. सोनाली लांजेवार यांनी करून दिला. या कार्यक्रमाचे सूत्रसंचलन श्रीमाला के.जी.यांनी तर आभार सीमा घोलप यांनी मांडले.

गुगल मीट या आभासी तंत्रज्ञानाद्वारे घेण्यात आलेल्या या एकदिवसीय राष्ट्रीय चर्चासत्रात मोठ्या प्रमाणात इतिहास प्रेमी,अभ्यासक व नव संशोधकांची उपस्थिती होती. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी डॉ. विलास वाहणे, डॉ.ज्ञानोबा कदम, हेमंत गोसावी, समन्वयक डॉ. माधवी महाके व इंडियन स्टुडंट कौन्सिलच्या सर्व पदाधिकारी यांनी परिश्रम घेतले.

# जागतिक दिव्यांग सप्ताहानिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन

लातूर: जिल्हा परिषद समाज कल्याण विभाग, जिल्हा दिव्यांग पुर्नवसन केंद्र, उमंग मल्टीडिसेबिल्टी सेंटर व दिव्यांग शाळा, कार्यशाळा व मतिमंद बालगृह यांच्या संयुक्त विद्यमाने ३ डिसेंबर, हा जागतिक दिव्यांग दिन साजरा करण्यात येणार आहे. यानिमित्त २ ते ९ डिसेंबर, २०२४ दरम्यान दिव्यांग सप्ताहाचे आयोजन करण्यात आले असून यानिमित्त विविध कार्यक्रम घेण्यात येणार आहेत. या अनुषंगाने लेबर कॉलनी येथील शासकीय अंध विद्यालयात जिल्ह्यातील दिव्यांग शाळेचे मुख्याध्यापक व कर्मचाऱ्यांची समाज कल्याण प्रादेशिक उपायुक्त समाज कल्याणचे अविनाश देवसटवार यांच्या अध्यक्षतेखाली बैठक घेण्यात आली.

यावेळी जिल्हा समाज कल्याण अधिकारी संतोषकुमार नाईकवाडी, जिल्हा समाज कल्याण अधिकारी गट ब विलास केंद्रे यांची प्रमुख उपस्थिती होती. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अनमोल सागर यांच्या मार्गदर्शनाखाली ही बैठकी घेण्यात आली. यात जागतिक दिव्यांग दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यासाठी कर्मचाऱ्यांकडून विविध कल्पना घेण्यात आल्या. यासह २ ते ९ डिसेंबर, २०२४ दरम्यान विविध कार्यक्रमांची रुपरेषा ठरविण्यात आली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक जिल्हा परिषदेचे वैद्यकीय सामाजिक कार्यकर्ता राजू गायकवाड यांनी तर आभार सहाय्यक सल्लागार बाळासाहेब वाकडे यांनी मानले.

दिव्यांग सप्ताह अंतर्गत ९ कार्यक्रम घेण्यात येणार असून २ डिसेंबर रोजी संत गाडगेबाबा अनाथ मतिमंद मुलांच्या बालगृहात दिव्यांग विद्याल्यांची नेत्र तपासणी करण्यात येणार आहे. ३ डिसेंबर रोजी सकाळी ११ वाजता उमंग मल्टीडिसेबिलिटी सेंटर येथे डोरमेन्ट्री हॉलचे उद्घघाटन होणार असून दुपारी १ वाजता स्व. दगडोजीराव देशमुख सांस्कृतिक सभागृह येथे दिव्यांग शाळेतील मुला-मुलींचा सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहे. दिव्यांग क्षेत्रात उल्लेखनिय कार्य करणाऱ्या व्यक्ती व संस्थांना पुरस्कारही देण्यात येणार आहे.

४ डिसेंबर रोजी नवीन जिल्हाधिकारी कार्यालयाच्या पाठीमागे उमंग मल्टीडिसेबिलिटी सेंटर येथे दिव्यांग मुलांसाठी आनंद नगरी व क्रीडा स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे. ४ व ५ डिसेंबर रोजी सुआश्रय निवासी अस्थिव्यंग विद्यालय इंडिया नगर येथे भौतिक उपचार शिबीर होणार आहे. ५ डिसेंबर रोजी ११ ते २ दरम्यान दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम २०१६ च्या कायदेविषयक कार्यशाळचे आयोजन व दुपारी ४ वाजता दिव्यांग मुलांच्या सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन उमंग मल्टीडिसेबिलिटी सेंटर येथे करण्यात येणार आहे.

६ व ७ डिसेंबर रोजी शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातील जिल्हा दिव्यांग पुनर्वसन केंद्रात दिव्यांग विद्यार्थ्यांचे उपचार शिबीर, वैद्यकीय तपासणी, वाचा व श्रवण तपासणी, कृत्रिम अवय मोजमाप, बुध्दांक तपासणी व समुपदेशन होणार आहे. ९ डिसेंबर रोजी श्री केशवराज विद्यालयात २१ प्रकारच्या दिव्यांग प्रवर्गाची माहिती प्रदर्शन व जनजागृती करण्यात येणार आहे. या कार्यक्रमास जिल्ह्यातील दिव्यांग बांधवांनी व विद्यार्थ्यांनी उपस्थित राहण्याचे आवाहन जिल्हा समाज कल्याण अधिकारी संतोषकुमार नाईकवाडी यांनी केले आहे.

# वैविध्यपूर्ण दिवाळी अंकांची परंपरा केवळ मराठी भाषेतच संविधान गौरव दिनी ग्रंथमित्र पांडुरंग अडसुळे यांचे प्रतिपादन

लातूरःसाहित्य,विज्ञान,आरोग्य,शेती,पर्यावरण ,ज्योतिशास्त्र आदि विविध विषयांवरील ज्ञान दिवाळी अंकांच्या माध्यमातून देण्याची गेली ११५ वर्षांची परंपरा आजही कायम असून,ज्या दिवाळी अंक जगभर परसलेला मराठी वाचक त्यांचा आस्वाद घेत असतो,दिवाळी अंक काढण्याची ही अभिमानास्पद परंपरा केवळ मराठी भाषेतच आहे असे सांगून,सर्वांगसुंदर अशा भारतीय संविधानामुळेच आपण आज सुरक्षित राहून विकासाच्या वाटा धुंडाळतो आहोत,असे प्रतिपादन ग्रंथमित्र पांडुरंग अडसुळे यांनी येथे केले.

लातूरच्या हरिभाऊ नगरातील सम्राट अशोक सार्वजनिक वाचनालयात मंगळवार,दि.२६ नोव्हेंबर २०२४ रोजी संविधान गौरव दिन आणि दिवाळी अंक प्रदर्शनाच्या उद्धाटन प्रसंगी उद्धाटक म्हणून ग्रंथमित्र अडसुळे बोलत होते.या कार्यक्रमाच्या अध्यक्षपदी साहित्यिक इंजि.हरिदास अडसुळे हे होते.

पुढे बोलताना ग्रंथमित्र अडसुळे पुढे म्हणाले की,ज्ञानाची परंपरा प्रगाढ आहे, ती टिकली पाहिजे,यासाठी सार्वजनिक ग्रंथालयातून काम केले जाते,बाराव्या शतकापासून संतांनी ज्ञानाची परंपरा



टिकवली. भारतात २२ बोली भाषा आहेत,डॉ.गणेश देवी यांनी भाषेचे संशोधन करुन दहा हजार बोली भाषेची सूची केली.सुमारे सव्वाशे वर्षांपासून दिवाळी अंकांमधून सुरु असलेली ही ज्ञान गंगा अहोरात्र वाहती ठेवण्याचे काम सार्वजनिक ग्रंथालये करीत आहेत.त्याचा उपयोग करुन घ्यावा.म.ज्योतिराव फुले,सयाजीराव गायकवाड,शाहू महाराज,बाबासाहेब आंबेडकर यांनीही वसतीगृहे,शाळा,ग्रंथालये सुरुवात करुन ज्ञानाचा प्रसार केला.अलिकडे ज्ञान बंदिस्त करण्याचे कारस्थान सुरु आहे,पण ज्ञानाची किंमत ओळखून आपण त्याचा उपयोग विकासासाठी करावा.संविधानाचे वाचन प्रत्येकाने केले पाहिजे हा देश सगळ्यांचा आहे,असेही ते म्हणाले.

अध्यक्षीय समारोपात इंजि.हरिदास अडसुळे यांनी संविधानाने सर्वांना विकासाच्या संधी उपलब्ध करुन दिले आहे,तथापि आज संविधानाला मोडीत काढण्याचे प्रयत्न होत आहेत,अशावेळी सर्वांनी याकडे गांभीर्याने पाहणे आवश्यक असल्याचे मत व्यक्त केले.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन सचिव बाळकृष्ण होळीकर यांनी केले.ग्रंथपाल अंजुषा काटे यांनी आभार मानले.प्रारंभी ग्रंथमित्र पांडुरंग अडसुळे यांच्या हस्ते दिपप्रज्वलन करुन करण्यात आले.नंतर मान्यवरांचे ग्रंथभेट देवून स्वागत करण्यात आले.

या कार्यक्रमाला लिपिक संकेत होळीकर,वाचक गणपत वाव्हळे,विकी सोमवंशी,प्रल्हाद गायकवाड,कवी प्रदीप कांबळे,अर्थव कदम,आर.एन.खाडप,जे. एन.माने,किशन यमुलवाड, धनराज कांबळे, मारुती तलवारे,जी.एच.गायकवाड,पी.एन.बसपूरे,एस. एस.साबळे,आनंद अडसुळे आदींची उपस्थिती होती.

# महाराष्ट्र नागरी सेवा संयुक्त पुर्व परीक्षा केंद्र परिसरात प्रतिबंधात्मक आदेश लागू

लातूर (जिमाका) : महाराष्ट्र नागरी सेवा संयुक्त पुर्व परीक्षा २०२४ रविवार, दिनांक १ डिसेंबर, २०२४ रोजी सकाळी १० वाजता ते दुपारी १२ पर्यंत व दुपारी ३ ते ५ पर्यंत दोन सत्रामध्ये आयोजित केलेली आहे. त्याअनुषंगाने निश्र्चित करण्यात आलेल्या परीक्षा केंद्राच्या परिसरात भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १६३ प्रमाणे प्रतिबंधात्मक आदेश लागू करण्यात आले आहेत.

लातूर शहरात बार्शी रोड येथील दयानंद कॉलेज ऑफ कॉमर्स न्ड बीसीए , अंबोजोगाई रोड लातूर येथील कॉलेज ऑफ कम्प्युटर सायंस अँन्ड इन्फॉरमेशन टेक्नालॉजी (कॉक्सिट), नांदेड रोड येथील यशवंत विद्यालय, जिजामाता कन्या प्रशाला, नारायण नगर येथील परिमल माध्यमिक विद्यालय, रिंगरोड येथील पोद्दार इंटरनॅशनल स्कुल, श्री गोदावरीदेवी लाहोटी कन्या विद्यालय, खाडगाव रोड येथील सरस्वती विद्यालय , शाहु चौक नांदेड रोड येथील ज्ञानेश्र्वर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, राजर्षी शाहु विज्ञान व कला महाविद्यालय, खाडगाव रोड येथील श्री.श्री. रविशंकर विद्यामंदिर , सिंग्रल कँम्प लातूर येथील श्री मारवाडी राजस्थान विद्यालय, खाडगाव रोड येथील श्रीमती सुशिलादेवी देशमुख महाविद्यालय , खाडगाव रोड येथील बसवन्नाप्पा वाले न्यु इंग्लिश मेडियम स्कुल, बार्शी रोड येथील दयानंद कला महाविद्यालय , श्याम नगर येथील श्री. केशवराज विद्यालय या उपकेंद्रावर परीक्षा आयोजित करण्यात आली आहे. परीक्षा कालावधीत या परीक्षा केंद्रावर व परिसरात गर्दीमुळे कोणताही अनुचित प्रकार घडून कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्र्न निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्या अनुषंगाने भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १६३ अन्वये जिल्हादंडाधिकारी वर्षा घुगे-ठाकूर यांनी परीक्षा केंद्राच्या १०० मीटरच्या परिसरात प्रतिबंधात्मक आदेश जारी केले आहेत.

परीक्षा केंद्राच्या परिसरात प्रवेश करतेवेळी पाचपेक्षा जास्त व्यक्ती एकत्रितरित्या प्रवेश करता येणार नाही. कोणत्याही प्रकारच्या घोषणा देता येणार नाहीत. परीक्षा केंद्राच्या परिसरात परिक्षार्थी अथवा अन्य व्यक्तीकडून शांततेस बाधा निर्माण होईल, असे कृत्य करता येणार नाही. १०० मीटरच्या परिसरातील झेरॉक्स सेंटर्स, पानटपरी, टायपींग सेंटर, एसटीडी बुथ, ध्वनिक्षेपक इत्यादी माध्यमे आदेशाची मुदत संपेपर्यंत बंद राहतील. परीक्षा केंद्राच्या परिसरात मोबाईल फोन, सेल्युलर फोन, ई-मेल व इतर प्रसारमध्यमे घेवून प्रवेश करण्यास मनाई असेल. कोणत्याही व्यक्तींकडून परीक्षा सुरळीतपणे व शांततेच्या वातावरणामध्ये पार पाडण्यासाठी कोणतीही बाधा उत्पन्न करता येणार नाही. परीक्षा केंद्रावर कोणत्याही अनाधिकृत व्यक्तीस, वाहनास प्रवेश मनाई राहील. हे आदेश परीक्षा केंद्रावर काम करणारे अधिकारी, कर्मचारी परीक्षार्थी केंद्रावर निगराणी करणारे अधिकारी व पोलीस अधिकारी, कर्मचारी यांच्याबाबत त्यांचे परीक्षासंबंधी कर्तव्ये पार पाडण्याच्या अनुषंगाने लागू राहणार नाहीत.

# पसंतीच्या वाहन नोंदणी क्रमांक आरक्षणासाठी ऑनलाईन सुविधा

मुंबईः नवीन नोंदणी क्रमांकाची मालिका सुरू केल्यानंतर क्रमांक आरक्षित करण्यासाठी लिलावाची प्रक्रिया परिवहन कार्यालयामार्फत राबविण्यात येते. लिलावाची ऑफलाईन प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर उर्वरित अनारक्षीत नोंदणी क्रमांक ऑनलाईन पद्धतीने आरक्षित करता येणार आहेत. त्यासाठी वाहन धारकांना पसंतीचा वाहन नोंदणी क्रमांक आरक्षीत करण्यासाठी परिवहन कार्यालयांमध्ये येण्याची गरज नाही. पसंतीचे वाहन नोंदणी क्रमांक आरक्षीत करण्यासाठी राज्यातील सर्व परिवहन कार्यालयांसाठी ऑनलाईन सुविधा कार्यान्वीत करण्यात आली आहे.

ही सेवा पूर्णपणे फेसलेस (चेहराविरहित) स्वरूपाची असून त्यासाठी अर्जदारास आधार संलग्न मोबाईल क्रमांक आवश्यक आहे. हा मोबाईल क्रमांक नोंद करून आधार ओटीपी किंवा मोबाईलद्वारे ओटीपी प्राप्त करून https://fancy.parivahan.gov.in/ या संकेतस्थळावर पसंतीचा नोंदणी क्रमांक आरक्षित करता येणार आहे.

सद्यस्थितीत नवीन मालिका सुरू केल्यानंतर नोंदणी क्रमांक आरक्षित करण्यासाठी लिलावाची कार्यपद्धती पूर्वीप्रमाणेच ऑफलाईन पद्धतीने सुरू राहणार आहे. विविध संवर्गातील वाहनांसाठी नवीन मालिका सुरू केल्यानंतर प्रथम संबंधित कार्यालयामार्फत आकर्षक अथवा पसंतीच्या क्रमांकासाठी अर्ज स्वीकारले जातील. त्यामध्ये पसंतीच्या नोंदणी क्रमांकासाठी एकापेक्षा जास्त अर्ज प्राप्त झाल्यास त्याबाबत लिलावाची प्रक्रिया पूर्ण करून जास्तीच्या रकमेचा धनाकर्ष सादर करणाऱ्या अर्जदारास संबंधित कार्यालयातील रोखपालद्वारे पसंतीच्या क्रमांकाचे शुल्क भरणा केल्याची पावती जारी करण्यात येईल.

या फेसलेस सेवेमुळे सुमारे २.५० लाख वाहन मालकांना परिवहन कार्यालयांना भेट देण्याची आवश्यकता नाही. नागरिकांना काही तांत्रिक अडचण आल्यास त्यांनी dytccomp.tpt-mhgov.in येथे ई-मेलद्वारे संपर्क साधावा. आकर्षक/पसंती क्रमांक आरक्षित करण्यासाठी वरीलप्रमाणे (workflow) कार्यपद्धतीचा अवलंब वाहनधारकांनी करावा व या फेसलेस सेवेचा लाभ घ्यावा, असे आवाहन परिवहन आयुक्त विवेक भिमनवार यांनी केले आहे.

अर्जदाराने https://fancy.parivahan.gov.in/ या संकेतस्थळावर जावून न्यू युजर / रजिस्टर नॉऊ यावर क्लिक करावे. यामध्ये संपूर्ण नोंदणीची प्रक्रिया पूर्ण करून ईमेल व मोबाईल क्रमांक ओटीपीद्वारे पडताळून घ्यावे. त्यानंतर संकेतस्थळावर लॉग इनमध्ये जावून ईमेल किंवा मोबाईल क्रमांकावर प्राप्त झालेले युजर आयडी व पासवर्ड टाकून लॉग इन करावे. त्यानंतर अर्जदाराने ऑनलाईन उपलब्ध असणारे पसंती क्रमांक निवडावे. यासाठी घेण्यात येणारे शुल्क एसबीआय ई पे या पेमेंट गेटवेवरून ऑनलाईन अदा करावे आणि प्रक्रिया पूर्ण करावी. त्यानंतर ई पावती प्रिंट काढून संबंधित वाहन विक्रेत्याकडे (डीलर)कडे नोंदणीसाठी देण्यात यावी.

